भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

**(१९१२ चा अधिनियम क्रमांक ८)**

[ १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान ]

# The Wild Birds and Animals Protection Act, 1912

**(Act No. 8 of 1912)**

[*As in force on the 1st March 1998*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[ **किंमत :** रुपये ९.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि वाईल्ड बर्ड्स् ॲन्ड ॲनिमल्स प्रोटेक्शन एक्ट, १९१२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक २, दिनांक १५ ऑक्टोबर १९९५ यात पृष्ठ ११६ ते ११७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Wild Birds And Animals Protection Act, 1912 as on the 1st March 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 9, dated 15th October on pages 116 to 117.

This authoritative text was published under the authority of the president under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 15th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

## कलमांचा क्रम

**कलमे.**


१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. अधिनियमाची प्रयुक्ती.

३. बंदीचा काळ.

४. शास्ती.

५. अधिहरण.

६. अपराधांची दखल.

७. सूट देण्याची शक्ती.

८. व्यावृत्ती.

९. निरसित.

**अनुसूची.**


(शा.म.मु.) एच ४३५६—२ (१०३५—५-०७)

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

## (१९१२ चा अधिनियम क्रमांक ८[1])

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[१८ सप्टेंबर १९१२]

**विवक्षित वन्य पक्षी आणि प्राणी यांचे संरक्षण आणि जतन यांसाठी अधिक चांगले उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विवक्षित वन्य पक्षी आणि प्राणी यांचे संरक्षण आणि जतन यांसाठी अधिक चांगले उपबंध करणे समायोचित आहे ; **त्याअर्थी** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

**१.** (१) या अधिनियमास, " वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२ " असे म्हणता येईल ; आणि

[2][ (२) त्याचा विस्तार [3][ १ नोव्हेंबर १९५६, पूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट असतील, त्या राज्यक्षेत्रांव्यतिरिक्त ] संपूर्ण भारतभर आहे. ]

**अधिनियमाची प्रयुक्ती.**

**२.** (१) हा अधिनियम प्रथमतः अनुसूची मध्ये विनिर्दिष्ट केलेले पक्षी, प्राणी वन्यस्थितीमध्ये असतील तेव्हा त्यांना प्रयुक्त होईल.

(२) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूचित विनिर्दिष्ट केलेले वन्य पक्षी व प्राणी यांच्या व्यतिरिक्त, त्याच्या मते संरक्षण किंवा जतन करणे इष्ट असेल अशा कोणत्याही प्रकारचे वन्य पक्षी व प्राणी यांना या अधिनियमाचे उपबंध प्रयुक्त करू शकेल.

**बंदीचा काळ.**

**३.** राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्याला हा अधिनियम प्रयुक्त होतो अशा कोणत्याही प्रकारच्या वन्य पक्षाच्या किंवा प्राण्याच्या बाबतीत किंवा अशा प्रकारच्या माद्या किंवा अपरिपक्व वन्य पक्षांच्या किंवा प्राण्यांच्या बाबतीत, आपल्या संपूर्ण राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, संपूर्ण वर्ष किंवा त्याचा कोणताही भाग बंदीचा काळ म्हणून घोषित करू शकेल आणि यात यापुढे अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या अधीनतेने, अशा बंदीच्या काळात आणि अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांमध्ये—

(क) बंदीच्या काळाच्या प्रारंभापूर्वी ज्या कोणत्याही पक्षाला किंवा प्राण्याला पकडण्यात आलेले नाही त्याला पकडणे किंवा त्याला ठार करणे ;

(ख) अशा बंदीच्या प्रारंभापूर्वी पकडण्यात न आलेल्या किंवा ठार करण्यात न आलेल्या कोणत्याही पक्ष्याची किंवा प्राण्याची किंवा त्याच्या मांसाची विक्री किंवा खरेदी करणे अथवा विक्रीसाठी किंवा खरेदीसाठी ते देऊ करणे किंवा पक्षी किंवा प्राणी किंवा त्याचे मांस जवळ बाळगणे ;

(ग) अशा बंदीच्या काळात पकडलेल्या किंवा ठार केलेल्या अशा कोणत्याही पक्ष्याचा कोणताही पिसारा काढून घेण्यात आला असेल तर, असा पिसारा विकणे किंवा खरेदी करणे अथवा विकण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी तो देऊ करणे अथवा तो जवळ बाळगणे—

हे बेकायदेशीर असेल.

---

१. हा विशोधित अधिनियम, बंगाल गेंडा जतन अधिनियम, १९३२ (१९३२ चा बंगाल अधिनियम ८), द्वारे पश्चिम बंगालला : वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण (उ. प्र. विशोधन) अधिनियम, १९३४ (१९३४ चा उ. प्र. अधिनियम १३) द्वारे उ. प्र. ला आणि वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण (मध्य प्रांत विशोधन), अधिनियम, १९३५ (१९३५ चा मध्यप्रांत अधिनियम २७) याद्वारे मध्य प्रांताला: वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण (अजमेर विशोधन), अधिनियम, १९५४ (१९५४ चा अजमेर अधिनियम ४) याद्वारे अजमेरला प्रयुक्त करताना त्यात विशोधन करण्यात आले आहे.

१९५८ चा म. प्र. अधिनियम २३ द्वारे संपूर्ण मध्य प्रदेशावर आणि १९६५ चा विनियम ८ कलम (३) आणि अनुसूचीद्वारे संपूर्ण लक्षद्वीप संघ राज्यक्षेत्रावर—

हा अधिनियम विस्तारीत करण्यात आला (दिनांक १ ऑक्टोबर, १९६७ रोजी व तेव्हापासून).

दादरा आणि नगर हवेलीवर (दिनांक १ जुलै, १९६५ रोजी आणि तेव्हापासून) ; १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एकद्वारे आणि १९६३ चा विनियम ७, कलम ३ आणि अनुसूची एकद्वारे पाँडेचरीवर—

हा अधिनियम विस्तारीत करण्यात व अंमलात आणण्यात आला. बेल्लारी राज्याला आणि पश्चिम बंगालला प्रयुक्त असलेला हा अधिनियम, अनुक्रमे १९५५ चा म्हैसूर अधिनियम १४ द्वारे व १९५९ चा पश्चिम बंगाल अधिनियम २५ द्वारे निरसित करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले.

३. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश १९५६ द्वारे " भाग ख राज्ये " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शास्ती. ४. (१) जो कोणी, कलम ३ चे उल्लंघन करून कोणतीही कृती करील किंवा करण्याचा प्रयत्न करील तो पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(२) जो कोणी, एखाद्या अपराधाबद्दल या कलमाखाली पूर्वीच सिद्धदोषी ठरला असून त्याच कलमाखाली पुन्हा सिद्धदोषी ठरला असेल तो नंतरच्या प्रत्येक दोषसिद्धीनंतर एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कारावासाच्या किंवा शंभर रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

अधिहरण. ५. (१) या अधिनियमाखालील एखाद्या शिक्षापात्र अपराधाबद्दल कोणतीही व्यक्ती सिद्धदोषी ठरली असेल त्या बाबतीत, ठरवणारा दंडाधिकारी, ज्या कोणत्याही पक्ष्याच्या किंवा प्राण्याच्या बाबतीत असा अपराध घडला असेल अशा पक्ष्याचे किंवा प्राण्याचे किंवा अशा पक्ष्याच्या किंवा प्राण्याच्या मांसाचे किंवा त्याच्या कोणत्याही इतर भागाचे अधिहरण करू शकेल.

(२) असे अधिहरण हे, अशा अपराधासाठी कलम ४ द्वारे उपबंधित केलेल्या इतर शिक्षांशिवाय आणखी असेल.

अपराधांची दखल. ६. इलाखा दंडाधिकारी किंवा द्वितीय वर्गाचा दंडाधिकारी याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

सूट देण्याची शक्ती. ७. वैज्ञानिक संशोधनाच्या दृष्टीने अशी शिकार करणे इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत असेल त्या बाबतीत, राज्य शासन कलम ३ द्वारे बेकायदेशीर म्हणून घोषित केलेली कोणतीही कृती करण्यासाठी लायसनधारकास हक्कदार ठरवण्याकरिता, ते लादू शकेल अशा निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही व्यक्तीस लायसन देऊ शकेल.

व्यावृत्ति. ८. या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, एखाद्या व्यक्तीने स्वसंरक्षणार्थ किंवा कोणत्याही इतर व्यक्तीच्या संरक्षणार्थ कोणत्याही वन्य प्राण्यास पकडण्यास किंवा त्याला ठार करण्यास किंवा संपत्तीच्या खऱ्याखुऱ्या संरक्षणार्थ कोणत्याही वन्य पक्ष्यास किंवा प्राण्यास पकडण्यास किंवा त्याला ठार करण्यास लागू होते, असे मानण्यात येणार नाही.

९. [ निरसित. ] दुसरे निरसन व विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १७), याच्या कलम ३ आणि अनुसूची दोन द्वारे निरसित.

## अनुसूची

(एक) माळढोक, बदक, सारस, जंगली कोंबडे, तितर, मोर-लांडोर, कृकण, कबुतर, लाव, वाळूतील एकपक्षी, पाणलावा, नांगी कोंबडे, एक प्रकारचा सुतारपक्षी (वुडकॉक), बगळा, एक जातीचा बगळा, रोलर्स आणि खंड्या पक्षी.

(दोन) मृग, गाढव, गवा, रेडा, हरिण, बकरा, ससा, बैल, गेंडा[१] आणि मेंढा.

---

१. बंगालला हा अधिनियम प्रयुक्त करताना " गेंडा " हा शब्द बंगाल गेंडा जतन अधिनियम, १९३२ (१९३२ चा बंगाल ८), कलम ७ द्वारे निरसित केला.

# THE WILD BIRDS AND ANIMALS PROTECTION ACT, 1912

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| confiscation | अधिहरण | [ Sec. (1) ] |
| flesh | मांस | [ Sec. 3(*b*) ] |
| immature wild birds | अपरिपक्व वन्य पक्षी | [ Sec. 3 ] |
| trial | संपरीक्षा | [ Sec. 6 ] |
| wild state | वन्यस्थिति | [ Sec. 2(*1*) ] |

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

# THE WILD BIRDS AND ANIMALS PROTECTION ACT,1912

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिहरण | confiscation | [ कलम ५(१) ] |
| अपरिपक्व वन्य प्राणी | immature wild birds | [ कलम ३ ] |
| मांस | flesh | [ कलम ३(ख) ] |
| वन्यस्थिति | wild state | [ कलम २(१) ] |
| संपरीक्षा | trial | [ कलम ६ ] |

## वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

### प्राणी आणि पक्षी यांच्या नावाची अनुसूची

(इंग्रजी-मराठी)

| | |
|---|---|
| Antelope | मृग |
| Ass | गाढव |
| Beer gazelle | हरिण |
| Bison | गवा |
| Buffalo | रेडा |
| Bustard | माळढोक |
| Duck | बदक |
| Egret | एक जातीचा बगळा |
| Florican | सारस |
| Goat | बकरा |
| Hare | ससा |
| Heron | बगळा |
| Jungle fowl | जंगली कोंबडी |
| King-fisher | खंड्यापक्षी |
| Oxe | बैल |
| Painted snipe | पाणलावा |
| Partridge | तितर |
| Peafoul | मोर-लांडोर |
| Pheasant | कृकण |
| Pigeon | कबुतर |
| Quail | लावा |
| Rhincoceros | गेंडा |
| Roller | रोलर |
| Sand-grouse | वाळूतील एक पक्षी |
| Ship | मेंढा |
| Spurfowl | नांगी कोंबडे |
| Wood-cock | एक प्रकारचा सुतारपक्षी |

# वन्य पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२

## प्राणी आणि पक्षी यांच्या नावाची अनुसूची

(मराठी-इंग्रजी)

| | |
|---|---|
| एक जातीचा बगळा | egret |
| एक प्रकारचा सुतारपक्षी | wood-cock |
| कबुतर | pigeon |
| कृकण | pheasant |
| खंड्यापक्षी | king-fisher |
| गवा | bison |
| गाढव | ass |
| गेंडा | rhinoceros |
| जंगली कोंबडी | jungle fowl |
| तितर | partridge |
| नांगी कोंबडे | spurfowl |
| पाणलावा | painted snipe |
| बकरा | goat |
| बगळा | heron |
| बदक | duck |
| बैल | oxe |
| माळढोक | bustard |
| मेंढा | ship |
| मोर-लांडोर | peafoul |
| मृग | antelope |
| रेडा | buffalo |
| रोलर | roller |
| लाव | quail |
| वाळूतील एक पक्षी | sand-grouse |
| ससा | hare |
| सारस | florican |
| हरिण | deer gazelle |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई